अमरावती महसूली विभागासाठी कामगार विभागांतर्गत कामगार उप आयुक्त यांचे विभागीय कार्यालय सुरु करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्रमांक : इएसटी-२०१९/प्र.क्र.१३४/कामगार - ८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २१ ऑगस्ट, २०१९.

वाचा:- वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि.२/६/२०१५.

प्रस्तावना:

अमरावती या महसूल विभागांतर्गत येणा-या अमरावती, वाशिम, बुलढाणा, अकोला, यवतमाळ या ५ जिल्हयांसाठी कामगार विभागाचे विभागीय कार्यालय म्हणून कामगार उप आयुक्त कार्यालय सुरु करण्याबाबतचा व सदर कार्यालयासाठी आवश्यक पदे स्थानांतरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

अमरावती या महसुली विभागाअंतर्गत येणाऱ्या अमरावती, वाशिम, बुलढाणा, अकोला, यवतमाळ या ५ जिल्हयांसाठी कामगार विभागाचे विभागीय कार्यालय म्हणून कामगार उप आयुक्त कार्यालय, अमरावती सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. कामगार उप आयुक्त, अमरावती कार्यालयाकरीता वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३९३/आपुक, दिनांक १६/८/२०१९ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार खालील पदे स्तंभ ५ येथे नमूद कार्यालयातुन कामगार उप आयुक्त, अमरावती कार्यालयाकडे कायमस्वरुपी स्थानांतरीत करण्यात येत आहेत.

अ. क्र.	पदनाम व संवर्ग	वेतनश्रेणी (मंजूर आकृतीबंधाप्रमाणे संवर्गाची वेतनश्रेणी)	मंजूर पद संख्या	स्थानांतरीत करावयाचे पद व मूळ कार्यालयाचे नाव
१.	२.	३.	४.	५.
१	कामगार उप आयुक्त, गट-अ	१५६००-३९१००+ ग्रेड वेतन ६६००	१	कामगार उप आयुक्त, मुंबई उपनगर, पूर्व- कामगार आयुक्त, मुंबई कार्यालय
२	सहायक कामगार आयुक्त, गट-अ	९३००-३४८००+ ग्रेड वेतन ५०००	१	सहायक कामगार आयुक्त, मुंबई उपनगर, पूर्व -कामगार आयुक्त, मुंबई कार्यालय
३	सरकारी कामगार अधिकारी, गट-ब	९३००-३४८००+ ग्रेड वेतन ४४००	२	सरकारी कामगार अधिकारी, मुंबई उपनगर, पूर्व येथील १ पद आणि सरकारी कामगार अधिकारी, मुंबई उपनगर, पश्चिम हे १ पद- कामगार आयुक्त, मुंबई कार्यालय

४	अधीक्षक, गट-क	९३००-३४८००+ ग्रेड वेतन ४२००	१	अपर कामगार आयुक्त, नागपूर कार्यालयातील १ पद
५	वरिष्ठ लिपिक, गट-क	५२००-२०२००+ ग्रेड वेतन २४००	१	अपर कामगार आयुक्त, नागपूर कार्यालयातील १ पद
६	लिपिक-टंकलेखक, गट-क	५२००-२००२००+ ग्रेड वेतन १९००	२	सहायक कामगार आयुक्त, गोंदिया कार्यालयातील १ पद आणि सरकारी कामगार अधिकारी, तुमसर कार्यालयातील १ पद
७	लघुटंकलेखक, गट-क	५२००-२०२००+ ग्रेड वेतन २४००	१	सहायक कामगार आयुक्त, भंडारा कार्यालयातील १ पद
८	शिपाई	४४००-७४४०+ग्रेड वेतन १३००	१	सरकारी कामगार अधिकारी, यवतमाळ कार्यालयातील १ पद
एकुण पदेः-			**१०**	

३. कामगार आयुक्त, मुंबई कार्यालयातील कामगार उप आयुक्त, मुंबई उपनगर, पूर्व हे पद स्थानांतरीत करण्यात आल्यामुळे मुंबई उपनगर जिल्हयासाठी कामगार उप आयुक्त, मुंबई उपनगर हे एकच पद कार्यरत राहील.

४. कामगार उप आयुक्त, अमरावती कार्यालयासाठी कायमस्वरुपी स्थानांतरीत करण्यात आलेल्या पदांवरील वेतन व भत्त्यांचा खर्च मागणी क्र. के-४, २२३०, कामगार व सेवायोजन, ०१, कामगार (००१), संचालन व प्रशासन, (००) (०२) कामगार उप आयुक्त प्रादेशिक, ०१ वेतन (२२३० ०४२३) या लेखाशिर्षातील उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१६४/१९, दि.१४/८/२०१९ आणि अनौपचारीक संदर्भ क्र.३९३/आपुक, दिनांक१६/८/२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०८२११७३५३१०८१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHASHANK
MADHAV SATHE

Digitally signed by SHASHANK MADHAV SATHE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=6b4e6443f4621997398029547f71977c2d89e32e391d622c519f39893078c3
0b, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=11a06bf85893554ac5cded657c0f1435af29a0ad118fb759493176e400
02b178, ou=INDUSTRY ENERGY AND LABOUR , o=GOVERNMENT OF
MAHARASHTRA, cn=SHASHANK MADHAV SATHE
Date: 2019.08.21 18:06:46 +05'30'

(श.मा. साठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रतः-

१. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा.प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),मुंबई-४०० ०५१.
५. सह कामगार आयुक्त, मुंबई.
६. कामगार उप आयुक्त (प्रशासन), कामगार भवन, वांद्रे (पू), मुंबई-४०००५१.
७. अपर कामगार आयुक्त, मुंबई /पुणे/नागपूर.
८. कामगार उप आयुक्त, औरंगाबाद /ठाणे / नाशिक.
९. कामगार विभागाचे सर्व क्षेत्रीय जिल्हा कार्यालय प्रमुख
१०. महालेखापाल, (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई/नागपूर.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१२. जिल्हा कोषागार अधिकारी,अमरावती/नागपूर/गोंदिया/भंडारा/भंडारा.
१३. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, उ.,ऊ.व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई.
१५. निवडनस्ती कामगार - ८.